Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर २०२६ । वर्ष १ । अंक २०३ । पाने ४ । Title Code - T/MHJAN/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

४० हून अधिक ग्रामपंचायतींमध्ये जुने दाखले ऑफलाईनच! (पान २ वर)



Selected

‘पक्षातील गोंधळ आम्हाला त्रासदायक’

मुंबई । राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद आणि पक्षातील निर्णयप्रक्रियेवरून सुरू असलेल्या संघर्षात आता भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने हस्तक्षेप केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना दिल्लीत बोलावून पक्षातील अंतर्गत गोंधळाबाबत नाराजी व्यक्त केल्याचे वृत्त समोर आले आहे. ‘तुमच्या पक्षातील गोंधळ आम्हाला त्रासदायक ठरत आहे,’ अशा शब्दांत शहांनी नेत्यांची कानउघाडणी केल्याचा दावा केला जात आहे. तसेच, ‘माझा निरोप पक्षनेतृत्वाला जसाच्या तसा कळवा,’ असा संदेशही त्यांनी दिल्याची चर्चा आहे. या घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील सत्ताकेंद्राचा संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे. विशेषतः पार्थ पवार यांच्या पक्षातील वाढत्या हस्तक्षेपावरून ज्येष्ठ नेत्यांमध्ये नाराजी असल्याचे बोलले जात आहे.

एका मोठ्या मंत्र्याला राजीनामा द्यावा लागू शकतो – रोहित पवारांचा खळबळजनक दावा!

शिक्षण विभागातील घोटाळ्याचा पर्दाफाश करणार!

जन सम्राट टाईम्स

नागपूर | राज्याच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा खळबळ उडवणारा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. शिक्षण विभागातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारा एक गंभीर घोटाळा स्टिंग ऑपरेशनच्या माध्यमातून उघड केल्याचा दावा त्यांनी केला.

आज मुंबईत पत्रकार परिषद घेऊन शिक्षण क्षेत्रातील कथित गैरव्यवहार उघड करणार

असून, हा प्रकार समोर आल्यानंतर राज्यातील एका मोठ्या मंत्र्याला राजीनामा द्यावा लागू शकतो, असेही त्यांनी म्हटले आहे. रोहित पवार यांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, त्यांच्या निशाण्यावर नेमके कोण आहेत, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. या प्रकरणाचा खुलासा करण्यासाठी ते उद्या मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सायंकाळी ४ वाजता पत्रकार परिषद घेणार आहेत.रोहित पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘एक्स’वर पोस्ट करत शिक्षण विभागातील कथित गैरव्यवहाराबाबत माहिती दिली. ते म्हणाले, “एकीकडे विद्यार्थ्यांनी अहोरात्र कष्ट करायचे, पालकांनी



त्यांच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहायची; तर दुसरीकडे प्रशासकीय गैरकारभार आणि भ्रष्ट नेत्यांनी ही स्वप्ने धुळीस मिळवायची. शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारा एक अत्यंत गंभीर घोटाळा स्टिंग ऑपरेशनच्या माध्यमातून शोधला आहे.” शिक्षणाचा मांडलेला बाजार पत्रकार परिषदेतून समोर आणणार असल्याचे सांगत त्यांनी या प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित केले. या कथित घोटाळ्यामुळे एका मोठ्या मंत्र्यालाही राजीनामा द्यावा लागू शकतो, असा दावा त्यांनी केला आहे. मात्र, संबंधित मंत्र्याचे नाव किंवा घोटाळ्याचे नेमके स्वरूप त्यांनी अद्याप स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे पत्रकार परिषदेत कोणते पुरावे आणि खुलासे समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काही दिवसांपूर्वी रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन झाले होते. या आंदोलनात राज्यभरातील विद्यार्थी सहभागी झाले होते. महाविकास आघाडीतील अनेक प्रमुख नेत्यांनीही आंदोलनस्थळी भेट देत विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला होता. विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी अनेक दिवस चाललेल्या या आंदोलनानंतर राज्य सरकारने आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्याचा दावा करण्यात आला होता. या आंदोलनानंतर आता रोहित पवार यांनी शिक्षण विभागातील कथित घोटाळ्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रश्न, शिक्षण क्षेत्रातील कारभार आणि सरकारी यंत्रणेतील कथित अनियमितता यावरून राज्य सरकारला पुन्हा एकदा राजकीय आव्हान मिळण्याची शक्यता आहे रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये मंत्र्याचे नाव जाहीर केलेले नाही. त्यामुळे हा कथित घोटाळा नेमका कोणत्या विभागाशी संबंधित आहे, त्यात कोणत्या स्तरावरील अधिकारी किंवा राजकीय व्यक्तींचा सहभाग असल्याचा त्यांचा दावा आहे आणि स्टिंग ऑपरेशनमध्ये कोणते पुरावे मिळाले आहेत, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. पत्रकार परिषदेत ते कोणते दस्तऐवज, व्हिडिओ किंवा अन्य पुरावे सादर करतात, यावर या प्रकरणाची पुढील दिशा अवलंबून असेल.

शरद पवारांची प्रकृती स्थिर; रोहित पवार

दरम्यान, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीबाबतही रोहित पवार यांनी माहिती दिली. प्रकृती अस्वस्थतेमुळे शरद पवार यांना पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. खोकल्याचा त्रास होत असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केले असून नियमित वैद्यकीय तपासण्या सुरू असल्याची माहिती यापूर्वी खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली होती. रोहित पवार यांनीही रुग्णालयात जाऊन शरद पवार यांची भेट घेतली आणि डॉक्टरांशी चर्चा केली. त्यांची प्रकृती व्यवस्थित असून काळजी करण्याचे कारण नाही. नियमित तपासण्यांसाठी त्यांना दाखल करण्यात आले असून तपासण्या पूर्ण झाल्यानंतर एक-दोन दिवसांत डिस्चार्ज मिळण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. एकीकडे शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत दिलासा देणारी माहिती, तर दुसरीकडे शिक्षण विभागातील कथित घोटाळ्याचा गौप्यस्फोट करण्याचा इशारा, यामुळे रोहित पवार यांच्या उद्याच्या पत्रकार परिषदेकडे राज्याचे राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

जळगाव जिल्हा परिषदेत १० हजारांची लाच... बांधकाम विभागाचे दोन अधिकारी जाळ्यात!

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जिल्हा परिषद बांधकाम उपविभागातील उपविभागीय अधिकारी आणि कनिष्ठ अभियंता यांना १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहाथ पकडले. रस्ता काँक्रीटीकरणाच्या बिलासाठी लाचेची मागणी करण्यात आली होती. कनिष्ठ अभियंत्यामार्फत उपविभागीय अधिकाऱ्याने ती स्वीकारल्यानंतर एसीबीने झडप घातली. सतीश मनसुलाल शिसोदे (वय ५५, उपविभागीय अधिकारी, वर्ग-१) आणि भागवत वसंत चवरे (वय ३२, कनिष्ठ अभियंता, वर्ग-३) अशी ताब्यात घेण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. या कारवाईमुळे जिल्हा परिषद बांधकाम विभागात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील तक्रारदार ४२ वर्षीय सब-कंत्राटदार असून त्यांनी सन २०२५-२६ मध्ये धरणगाव तालुक्यातील पिंप्री खुर्द येथे गावांतर्गत रस्ता काँक्रीटीकरणाचे काम केले होते. या कामाची एकूण किंमत ९ लाख ९० हजार ७६३ रुपये होती. काम पूर्ण झाल्यानंतर त्याची मोजणी पुस्तिका (एमबी) तयार करणे आणि बिले बनविण्यासाठी कनिष्ठ अभियंता भागवत चवरे यांनी यापूर्वीच तक्रारदाराकडून २० हजार रुपये स्वीकारले होते. मात्र, काम पूर्ण होऊनही बिल मंजूर झाले नसल्याने तक्रारदाराने उपविभागीय कार्यालयात जाऊन विचारणा केली. त्यावेळी बिलावर स्वाक्षरी करून पुढील मंजुरीसाठी पाठविण्याच्या मोबदल्यात उपविभागीय अधिकारी सतीश शिसोदे यांच्यासाठी एकूण बिलाच्या १.५ टक्के प्रमाणे १५ हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनंतर एसीबीचा सापळा



लाचेच्या मागणीला कंटाळून तक्रारदाराने २ नोव्हेंबर २०२६ रोजी जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. एसीबीच्या पथकाने तक्रारीची पडताळणी केली. यावेळी पंचांसमक्ष झालेल्या चर्चेत १ टक्के प्रमाणे १० हजार रुपये लाच स्वीकारण्याचे ठरले. त्यानुसार २ नोव्हेंबर रोजी संबंधित कार्यालयात एसीबीच्या पथकाने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे कनिष्ठ अभियंता भागवत चवरे यांनी तक्रारदाराकडून १० हजार रुपये स्वीकारले. त्यानंतर ही रक्कम त्यांनी उपविभागीय अधिकारी सतीश शिसोदे यांच्याकडे दिली. शिसोदे यांनी लाचेची रक्कम स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने पंचांसमक्ष कारवाई करून रक्कम जप्त केली. या कारवाईत दोन्ही अधिकाऱ्यांना रंगेहात पकडण्यात आले. अंगझडतीत सव्वा लाखांहून अधिक रक्कम कारवाईनंतर दोन्ही अधिकाऱ्यांची अंगझडती घेण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी सतीश शिसोदे यांच्याकडून ॲपल कंपनीचा मोबाईल फोन आणि ९१ हजार ६२० रुपये रोख रक्कम आढळून आली. तर कनिष्ठ अभियंता भागवत चवरे यांच्याकडून विवो कंपनीचा मोबाईल फोन आणि २० हजार ६०० रुपये रोख जप्त करण्यात आले. दोघांकडील रोख रक्कम एक लाख १२ हजार २२० रुपये असून, लाचेच्या रकमेसह जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया या प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाच्या कलम ७ आणि १२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दोन्ही आरोपींना एसीबीने ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात येत आहे. ही कारवाई एसीबी नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रदीप मैराळे आणि अप्पर पोलीस अधीक्षक कविता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक रेश्मा अवतारे, पोलीस हवालदार बाळू मराठे आणि महिला पोलीस हवालदार संगीता पवार यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

जळगाव जिल्हा न्यायालयाला बॉम्बस्फोटाची धमकी!

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: महाराष्ट्रातील न्यायव्यवस्थेला लक्ष्य करत राज्यातील सर्व जिल्हा व सत्र न्यायालयांना बॉम्बस्फोट घडवून उडवून देण्याची धमकी देणारा ई-मेल प्राप्त झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या धमकीमध्ये जळगाव जिल्हा व सत्र न्यायालयाचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी धमकीचा ई-मेल मिळताच पोलीस प्रशासनाने तातडीने खबरदारीच्या उपाययोजना सुरू केल्या. बॉम्ब शोधक व नाशक पथकाने (बीडीडीएस) परिस्थितीचे गांभीर्य ओळखून न्यायालयाच्या इमारतीसह संपूर्ण परिसराची कसून तपासणी केली. या तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा हालचाल आढळून आली नसल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली. धमकीचा ई-मेल मिळताच सुरक्षा यंत्रणा सतर्क न्यायालयासारख्या महत्त्वाच्या शासकीय ठिकाणाला बॉम्बस्फोटाची धमकी मिळाल्याने जळगावमध्ये सुरक्षा यंत्रणांची धावपळ उडाली.

राज्यातील सर्व जिल्हा व सत्र न्यायालयांना लक्ष्य करण्याची धमकी असल्याची माहिती समोर आल्यानंतर जळगाव पोलिसांनी



तातडीने तपासणी सुरू केली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी न्यायालय परिसरातील सुरक्षेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. बीडीडीएस पथकाकडून कसून तपासणी धमकीच्या ई-मेलची माहिती मिळताच बॉम्ब शोधक व नाशक पथक न्यायालयात दाखल झाले. पथकाने न्यायालयाच्या इमारतीतील विविध दालने, महत्त्वाच्या जागा तसेच संभाव्य संवेदनशील भागांची बारकाईने तपासणी केली. न्यायालयाच्या बाहेरील परिसराचीही पाहणी करण्यात आली. या संपूर्ण तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. धमकीच्या ई-मेलचा तपास सुरू या धमकीमुळे न्यायालयीन कामकाज आणि परिसराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. धमकीचा ई-मेल नेमका कोठून आणि कोणी पाठवला, यामागे कोणाचा उद्देश आहे, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, पोलीस प्रशासनाने नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, असे आवाहन केले आहे. न्यायालयासारख्या संवेदनशील ठिकाणाला मिळालेल्या धमकीमुळे पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून, या प्रकरणाच्या पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दियाचा व्हिडीओ डिलीट केल्याने मुंबईत नवा वाद

मुंबई: मुंबईत सध्या महापालिकेच्या प्रदूषणमुक्त दिवाळीच्या जनजागृती मोहिमेवरून वेगळाच वाद रंगला आहे. महापालिकेच्या या मोहिमेअंतर्गत पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करण्यात येत होते. यासाठी अभिनेत्री दिया मिर्झा यांनी व्हिडिओमार्फत जनजागृतीपर आवाहन केले होते. पण, भाजपने या व्हिडीओवरून नाराजी व्यक्त करत आक्रमक भूमिका घेतली आणि त्यानंतर महापालिकेच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून तो काढून टाकण्यात आला. त्यामुळेच आता नवा वाद निर्माण झाला आहे. यावरूनच आता राजकीय वाद रंगत असताना शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी सडकून टीका केली आहे.

देगलूर तालुक्यात ‘संविधान जागृती अभियान’!



जन सम्राट टाईम्स

देगलूर | प्रतिनिधी: भारतीय संविधानाचे विचार गावागावांत पोहोचवून नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने नैतिक भीम क्रांती चॅरिटेबल ट्रस्ट, सुंडगी यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात ‘गाव-गाव संविधान जागृती अभियान’ राबविण्यात येत आहे. १४ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या या अभियानाचा कालावधी २ वर्षे ११ महिने १८ दिवसांचा आहे. या अभियानांतर्गत देगलूर तालुक्यात आतापर्यंत ४७ ग्रामपंचायती आणि ४ शाळा-महाविद्यालयांमध्ये असे एकूण ५१ कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतीत संविधान वाचनाचे नियोजन आगामी नोव्हेंबर २०२६ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत देगलूर तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये दररोज एक ते दोन तास संविधान वाचन आणि जनजागृतीचे उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, काही ग्रामसेवक कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित राहत नसल्याने, फोन करूनही प्रतिसाद देत नसल्याने तसेच विविध कारणे सांगून कार्यक्रम टाळत असल्याने अभियानाच्या नियोजनात अडचणी निर्माण होत असल्याचे ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले. ग्रामसेवकांना सहकार्याचे निर्देश देण्याची मागणी या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत कार्यालय संविधान वाचनासाठी दररोज एक ते दोन तास उपलब्ध करून द्यावे, अभियानाच्या कार्यकर्त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे, योग्य समन्वय साधावा तसेच सर्व ग्रामसेवकांना सहकार्य करण्याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी गटविकास अधिकाऱ्यांना (बीडीओ) निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. भारतीय संविधानातील मूल्ये, लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचे विचार गावागावांतील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा सामाजिक व शैक्षणिक उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे या अभियानाला पंचायत समिती प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा ट्रस्टच्या वतीने व्यक्त करण्यात आली. ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित निवेदन देताना तसेच अभियानाची माहिती देताना नैतिक भीम क्रांती चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष बालाजी कांबळे यांच्यासह मारोतीराव कांबळे, यशवंत सूर्यवंशी, जळबा वाघमारे, रमेश कांबळे भायेगावकर आणि शंकर कांबळे उपस्थित होते. गावागावांत पोहोचवून नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने नैतिक भीम क्रांती चॅरिटेबल ट्रस्ट, सुंडगी यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात ‘गाव-गाव संविधान जागृती अभियान’ राबविण्यात येत आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

विद्यापीठाजवळील कुबेर इमारतीत गोळीबार; 50 ते 60 विद्यार्थी भयभीत

परिसरात मोठी खळबळ या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: पाळधी विद्यापीठासमोरील रस्त्यावर हॉटेलशेजारी असलेल्या तीन मजली कुबेर इमारतीत सोमवारी रात्री सुमारे दहाच्या सुमारास गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या इमारतीतील एका मजल्यावर खासगी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांचे वसतिगृह, तर त्यावरील मजल्यावर पत्र्याचे शेड व ग्रीन नेट लावून पत्त्यांचा क्लब सुरू असल्याची माहिती आहे. गोळीबाराच्या आवाजाने वसतिगृहातील ५० ते ६० विद्यार्थी भयभीत झाले आणि त्यांनी इमारतीतून पळ काढला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. गावठी कट्ट्याची चाचणी घेताना गोळीबार? कुबेर इमारतीच्या पहिल्या मजल्यावर ‘गुरु ॲकेडमी’ नावाची खासगी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण संस्था आहे. त्यावरील मजल्यावर पत्र्याचे शेड उभारून आणि ग्रीन नेट लावून पत्त्यांचा क्लब सुरू करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. घटनेच्या वेळी या क्लबमध्ये चार ते सहा जण उपस्थित होते. ते एका कारमधून आणि दुचाकींवरून तेथे आले होते, असे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. यापैकी एका व्यक्तीने नव्याने आणलेल्या गावठी कट्ट्याची चाचणी घेण्यासाठी गोळीबार केल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, गोळीबार नेमका कोणत्या कारणातून झाला आणि त्यामागील व्यक्ती कोण आहेत, याचा तपास पोलीस



करीत आहेत. गोळीबाराच्या आवाजाने विद्यार्थ्यांची धावपळ रात्री अचानक गोळीबाराचा आवाज ऐकू आल्याने पत्त्यांच्या क्लबमधील व्यक्ती आणि हॉस्टेलमध्ये राहणारे विद्यार्थी घाबरले. ५० ते ६० विद्यार्थ्यांनी भीतीपोटी इमारतीतून बाहेर पळ काढला. घटनेच्या वेळी परिसरात एकच गोंधळ उडाला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही या घटनेमुळे ऐरणीवर आला आहे. एका व्यक्तीला मारहाण करून ओढत नेल्याचा दावा या घटनेबाबत एका विद्यार्थ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर धक्कादायक माहिती दिली.

त्याच्या म्हणण्यानुसार, गोळीबारानंतर दोन जणांनी शटरवर दगड मारले. त्यानंतर एका व्यक्तीला मारहाण करत त्याचे पाय धरून ओढत नेण्यात आले. “मी वडिलांसाठी येथेच थांबलो होतो. बाकीची मुले पळून गेली. घाबरून मी शटर ओढून आत थांबलो,” अशी आपबिती या विद्यार्थ्याने सांगितली. या दाव्याची पोलीस तपासातून पडताळणी होणे महत्त्वाचे आहे. पोलीस पथक घटनास्थळी; रात्री उशिरापर्यंत तपास गोळीबाराची माहिती मिळताच पोलीस अधीक्षकांनी पाळधी आऊटपोस्टचे एपीआय भूषण कोते आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना तातडीने घटनास्थळी रवाना केले. पोलिसांनी संपूर्ण परिसराची तपासणी सुरू केली. गोळीबारात वापरलेल्या काडतुसाची पुंगळी शोधण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. या घटनेत गोळीबार कोणी केला, गावठी कट्टा कोणाकडे होता, एका व्यक्तीला मारहाण करून ओढत नेल्याच्या दाव्यामागील सत्य काय आणि इमारतीतील पत्त्यांचा क्लब नेमका कोण चालवत होते, या प्रश्नांची उत्तरे पोलीस तपासातून समोर येणार आहेत. विद्यापीठ परिसरालगत घडलेल्या या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त होत आहे.पाळधी विद्यापीठासमोरील रस्त्यावर हॉटेलशेजारी असलेल्या तीन मजली कुबेर इमारतीत सोमवारी रात्री सुमारे दहाच्या सुमारास गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या इमारतीतील एका मजल्यावर खासगी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांचे वसतिगृह, तर त्यावरील मजल्यावर पत्र्याचे शेड व ग्रीन नेट लावून पत्त्यांचा क्लब सुरू असल्याची माहिती आहे.

40 हून अधिक ग्रामपंचायतींमध्ये जुने दाखले ऑफलाईनच!

समर्पण फाऊंडेशनचा गटविकास अधिकाऱ्यांना १५ दिवसांचा अल्टिमेटम

जन सम्राट टाईम्स

सोयगावा प्रतिनिधी : डिजिटल युगात शासकीय कामकाजासाठी ऑनलाइन आणि QR कोडयुक्त प्रमाणपत्रांची आवश्यकता वाढत असताना सोयगाव तालुक्यातील ४० हून अधिक ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांचे जुने हस्तलिखित दाखले अद्याप ऑफलाईन स्वरूपातच असल्याचा मुद्दा समोर आला आहे. जन्म, मृत्यू, विवाह, जात, उत्पन्न आणि रहिवासी दाखल्यांचे ऑनलाइन डिजिटायझेशन करून नागरिकांना QR कोडयुक्त प्रमाणपत्रे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी समर्पण फाऊंडेशन, आमखेडा यांनी गटविकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती सोयगाव यांच्याकडे सामूहिक निवेदनाद्वारे केली आहे. या मागण्यांवर १५ दिवसांत प्राथमिक कार्यवाही सुरू न झाल्यास वरिष्ठ प्रशासन आणि न्यायालयीन स्तरावर पाठपुरावा करण्याचा इशाराही संस्थेने दिला आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि वंचित घटकांची गैरसोय समर्पण फाऊंडेशन ही सोयगाव तालुक्यात कार्यरत सामाजिक संस्था असून, तालुक्यातील अनेक नागरिकांकडे जुन्या हस्तलिखित स्वरूपातील दाखल्यांच्या नोंदी असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, अनुसूचित जाती-जमाती, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे आणि निरक्षर नागरिकांना या प्रक्रियेमुळे अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संस्थेचे म्हणणे आहे. बँकिंग व्यवहार, पासपोर्ट, शाळा-महाविद्यालयांतील प्रवेश, शासकीय योजना आणि निवडणुकीसंबंधी कामांसाठी ऑनलाइन प्रमाणपत्रांची मागणी केली जाते. मात्र ग्रामपंचायत स्तरावर डिजिटल सेवा एकसमान पद्धतीने उपलब्ध नसल्याने नागरिकांना वारंवार कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. प्रमाणपत्रांच्या पडताळणीबाबतही चिंता छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश



महाराष्ट्र शासनाच्या डिसेंबर २०२५ मधील शासन निर्णयानुसार १४ विशेष तपासणीसाठी निर्देशित जिल्ह्यांमध्ये असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित प्रक्रियेनुसार निर्धारित कार्यपद्धतीशी विसंगत असलेल्या प्रमाणपत्रांची पुनर्तपासणी आवश्यक असल्याचे संस्थेने नमूद केले आहे. त्यामुळे सोयगाव तालुक्यातील नोंदींची वेळीच पडताळणी आणि डिजिटायझेशन करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील शेंदुर्सनी ग्रामपंचायतीत २७ हजार ३९८ कथित बनावट जन्मनोंदी आणि सात मृत्यू नोंदी आढळल्याच्या प्रकरणाचाही निवेदनात संदर्भ देण्यात आला आहे. या प्रकरणाच्या चौकशीचा उल्लेख करताना राज्यातील ग्रामपंचायतींच्या नोंदींच्या विश्वासार्हतेबाबत संस्थेने चिंता व्यक्त केली आहे. निवेदनातील सहा प्रमुख समस्या समर्पण फाऊंडेशनने ग्रामपंचायत स्तरावरील सहा प्रमुख अडचणी निदर्शनास आणल्या आहेत. १. Mahaegram पोर्टलचे सक्रियकरण प्रत्येक ग्रामपंचायतीत वेगवेगळे असून काही ठिकाणी सेवा सुरू, तर काही ठिकाणी बंद असल्याचा दावा. २. ग्रामसेवकांसाठी एकसमान प्रमाणित कार्यपद्धती (SOP) उपलब्ध नसल्याने कामकाजात विसंगती. ३. सेवा हक्क कायद्यानुसार निश्चित शुल्काऐवजी अधिक पैसे मागितले जात असल्याच्या तक्रारी; काही ठिकाणी पावती मिळत नसल्याचा आरोप. ४. दाखले निर्धारित १५ ते ३० दिवसांच्या कालावधीत मिळण्याऐवजी अनेक महिने प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार. ५. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक, अनुसूचित जाती-जमाती आणि महिलांना वारंवार ग्रामपंचायत कार्यालयात जावे लागत असल्याने होणारा त्रास. ६. प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया, शुल्क आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती देणारा लेखी सूचना फलक ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर नसणे. डिजिटायझेशनसाठी १२ मागण्या संस्थेने तालुक्यातील ४० हून अधिक ग्रामपंचायतींचे Mahaegram आणि CRS पोर्टल सक्रियतेचे ३० दिवसांत ऑडिट करून अहवाल सादर करावा, जुन्या ऑफलाईन नोंदींचे ९० दिवसांत डिजिटायझेशन करावे, प्रत्येक ग्रामपंचायतीबाहेर मराठीत सूचना फलक लावावा आणि पंचायत समितीने एकसमान मराठी SOP तयार करून सर्व ग्रामसेवकांना द्यावी, अशा मागण्या केल्या आहेत. याशिवाय, निवेदनात नमूद केलेले २० रुपये शुल्कच आकारून प्रत्येक व्यवहाराची अधिकृत पावती देणे, पंचायत समितीमध्ये तालुकास्तरीय स्वतंत्र हेल्प डेस्क सुरू करणे, प्रत्येक ग्रामपंचायतीने मासिक अनुपालन अहवाल सादर करणे, नागरिकांच्या तक्रारींना सात दिवसांत प्रतिसाद देणे, BPL, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, SC/ST, महिला आणि दिव्यांगांच्या अर्जांना सात दिवसांत प्राधान्याने सेवा देणे, प्रत्येक गावात जनजागृती मोहीम राबविणे आणि सर्व ग्रामसेवकांचे ४५ दिवसांत अनिवार्य प्रशिक्षण आयोजित करणे, या मागण्यांचाही समावेश आहे. तसेच ३१ मार्च २०२७ पर्यंत सर्व जुन्या नोंदींचे १०० टक्के डिजिटायझेशन पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करावे, अशी मागणी संस्थेने केली आहे.

दीपोत्सवाच्या प्रकाशात उजळला छाजेड विद्यामंदिराचा परिसर!

पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश देत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स

नांदगावा प्रतिनिधी : नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्व. मिश्रीलाल भिकचंद छाजेड विद्यामंदिर, नांदगाव येथे दीपावलीच्या पावन पर्वानिमित्त दीपोत्सव मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. दिव्यांची आरास, विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकर्षक आकाशकंदील आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश यामुळे शाळेचा परिसर प्रकाशमय झाला होता. या कार्यक्रमाला शाळेचे अधीक्षक भैय्यासाहेब चव्हाण, मुख्याध्यापिका सुनीता जाधव, माता पालक संघाच्या उपाध्यक्षा सुवर्णा आहेर तसेच संघाच्या सर्व सन्माननीय सदस्या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि लक्ष्मी पूजनाने करण्यात आली. आकाशकंदील आणि पणत्यांनी सजला परिसर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेले आकर्षक आकाशकंदील आणि सुबक पणत्यांनी शाळेच्या प्रांगणात सुंदर सजावट केली होती. सर्वत्र दिव्यांचा प्रकाश आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे दीपोत्सवाचे वातावरण अधिकच प्रसन्न झाले. यावेळी अधीक्षक भैय्यासाहेब चव्हाण यांनी विद्यार्थी



आणि शिक्षकांना दीपावलीच्या शुभेच्छा देत मौलिक मार्गदर्शन केले. पर्यावरणपूरक दिवाळी कशी साजरी करावी, याविषयी त्यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले. फटाक्यांमुळे होणारे वायू आणि ध्वनीप्रदूषण टाळून दिव्यांची आरास, आनंद आणि उत्साहातून दिवाळी साजरी करण्याचे आवाहन त्यांनी केले. गायकवाड सर यांनी दिवाळी सणाचे सांस्कृतिक महत्त्व विशद केले. ई-कचरा व्यवस्थापनावरील नाटिकेतून चिमुकल्यांचे प्रबोधन कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली ती इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली प्रबोधनात्मक नाटिका. वंश, आर्यन, आरव, आर्या, आद्या, ॲलेक्स आणि अमय या विद्यार्थ्यांनी 'ई-कचरा आणि कचरा व्यवस्थापन' या विषयावर प्रभावी सादरीकरण केले. कोणत्या रंगाच्या कचरापेटीत कोणत्या प्रकारचा कचरा टाकावा, याचे प्रात्यक्षिकासह सादरीकरण करून विद्यार्थ्यांनी स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. या नाटिकेसाठी आशा शेवरे मॅडम यांनी मार्गदर्शन केले. शाळेचे शिक्षक प्रतिनिधी नारळी सर यांनी केलेल्या आकर्षक फलकलेखनामुळे दीपोत्सवाच्या सजावटीत आणखी भर पडली. गोड लाडू वाटपाने कार्यक्रमाची सांगता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील सर यांनी केले, तर नारळी सर यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना गोड लाडू वाटप करून आनंदात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा दीपोत्सव केवळ सण साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, पर्यावरणाविषयी जागरूकता, स्वच्छतेची सवय आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा ठरला.नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्व. मिश्रीलाल भिकचंद छाजेड विद्यामंदिर, नांदगाव येथे दीपावलीच्या पावन पर्वानिमित्त दीपोत्सव मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. दिव्यांची आरास, विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकर्षक आकाशकंदील आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश यामुळे शाळेचा परिसर प्रकाशमय झाला होता. या कार्यक्रमाला शाळेचे अधीक्षक भैय्यासाहेब चव्हाण, मुख्याध्यापिका सुनीता जाधव, माता पालक संघाच्या उपाध्यक्षा सुवर्णा आहेर तसेच संघाच्या सर्व सन्माननीय सदस्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि लक्ष्मी पूजनाने करण्यात आली. आकाशकंदील आणि पणत्यांनी सजला परिसर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेले आकर्षक आकाशकंदील आणि सुबक पणत्यांनी शाळेच्या प्रांगणात सुंदर सजावट केली होती. सर्वत्र दिव्यांचा प्रकाश आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे दीपोत्सवाचे वातावरण अधिकच प्रसन्न झाले. यावेळी अधीक्षक भैय्यासाहेब चव्हाण यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांना दीपावलीच्या शुभेच्छा देत मौलिक मार्गदर्शन केले. पर्यावरणपूरक दिवाळी कशी साजरी करावी, याविषयी त्यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले. फटाक्यांमुळे होणारे वायू आणि ध्वनीप्रदूषण टाळून दिव्यांची आरास, आनंद आणि उत्साहातून दिवाळी साजरी करण्याचे आवाहन त्यांनी केले. गायकवाड सर यांनी दिवाळी सणाचे सांस्कृतिक महत्त्व विशद केले.

मानसी, मुक्ताई आणि श्रद्धाची रोलर स्केटिंगमध्ये भरारी!

जन सम्राट टाईम्स

भडगाव | प्रतिनिधी : भडगाव तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी येथील तीन युवा खेळाडूंनी रोलर स्केटिंग स्पर्धेत केली आहे. कु. श्रद्धा बापूराव पाटील हिने १७ वर्षांखालील वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला, तर कु. मुक्ताई वैभव सोलाट आणि कु. मानसी निलेश ब्राह्मणकर यांनी ११ वर्षांखालील वयोगटात तृतीय क्रमांक मिळवला. या यशामुळे तिन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विभागीय स्पर्धेत तिघींची दमदार कामगिरी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय रोलर स्केटिंग स्पर्धा २०२६ मध्ये या खेळाडूंनी आपल्या कौशल्याची छाप पाडली. श्रद्धाने प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले, तर मुक्ताई आणि मानसी यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विभागीय स्तरावरील या यशामुळे आता त्यांना राज्यस्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार आहे. अधिकाऱ्यांच्या कन्यांचीही क्रीडा क्षेत्रात चमक मुक्ताई वैभव सोलाट ही भडगावच्या तहसीलदार शितल सोलाट यांची कन्या आहे. तर मानसी निलेश ब्राह्मणकर ही भडगाव पोलीस



ठाण्याच्या गोपनीय विभागात कार्यरत पोलीस कॉन्स्टेबल निलेश ब्राह्मणकर (बहाळ) यांची कन्या आहे. श्रद्धा बापूराव पाटील हिनेही आपल्या कामगिरीने भडगावचे नाव उज्ज्वल केले आहे. लहान वयातच जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर या तिघींनी हे यश मिळवले आहे. विभागीय स्तरावर मिळालेले यश परिश्रमांची पोचपाती मानले जात आहे. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा या तिन्ही खेळाडूंना मार्गदर्शन करणारे अतिक साटोटे, सुनील मोरे तसेच गजानन स्पोर्ट्स अकॅडमी (पाचोरा व भडगाव) यांचे विशेष योगदान आहे. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, खेळाडूंची मेहनत आणि सरावातील सातत्य यामुळेच त्यांना हे यश मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेतही यशाची अपेक्षा श्रद्धा, मानसी आणि मुक्ताई यांच्या यशाबद्दल त्यांचे कुटुंबीय, प्रशिक्षक, क्रीडाप्रेमी आणि परिसरातील नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संपादकीय

राष्ट्रवादीतील अंतर्गत कलह : सत्तेचा रिमोट कोणाच्या हातात?

ज्येष्ठ नेत्यांना डावलून पक्ष चालविण्याचा प्रयत्न किती काळ टिकणार? दिल्लीतील हस्तक्षेपाच्या चर्चेने राष्ट्रवादीतील नेतृत्व, निष्ठा आणि निर्णयप्रक्रियेचा प्रश्न ऐरणीवर महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष नेहमीच सत्तेच्या समीकरणांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आला आहे. संघटनात्मक ताकद, अनुभवी नेत्यांची फळी, कार्यकर्त्यांचे जाळे आणि सत्तेच्या राजकारणातील चाणक्यनीती ही या पक्षाची ओळख राहिली आहे.

मात्र, आज त्याच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद, नेतृत्वाचा संघर्ष आणि निर्णयप्रक्रियेवरील वर्चस्वाची लढाई उघडपणे चर्चेत आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांना दिल्लीत बोलावून घेतल्याच्या आणि पक्षातील गोंधळाबाबत नाराजी व्यक्त केल्याच्या वृत्ताने या संघर्षाला नवे वळण मिळाले आहे. 'तुमच्या पक्षातील गोंधळ आम्हाला त्रासदायक ठरत आहे,' अशा आशयाचा संदेश दिल्याची चर्चा ही केवळ एका बैठकीपुरती मर्यादित नाही; तर ती राष्ट्रवादीच्या अंतर्गत व्यवस्थेवर आणि महायुतीतील परस्पर विश्वासावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. राजकारणात मतभेद असणे गैर नाही. उलट, लोकशाही व्यवस्थेत मतभिन्नता ही पक्षाला अधिक सक्षम बनविण्याचे साधन ठरू शकते. मात्र, मतभेदांचे रूपांतर गटबाजी, एकाधिकारशाही आणि पदांच्या वाटपावरून होणाऱ्या संघर्षात झाले, तर पक्षाच्या संघटनात्मक आरोग्याला धोका निर्माण होतो. राष्ट्रवादीतील सध्याच्या घडामोडींकडे पाहताना हाच प्रश्न प्रकर्षाने समोर येतो. पक्षात अनुभवी आणि ज्येष्ठ नेत्यांची मोठी फळी असताना निर्णयप्रक्रियेत त्यांना किती स्थान दिले जाते? संघटनेतील नियुक्त्या कोणाच्या सल्ल्याने होतात? पक्षाची दिशा ठरविण्याचा अधिकार नेमका कोणाकडे आहे? या प्रश्नांची उत्तरे आता पक्षनेतृत्वाला द्यावी लागतील. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांसारख्या नेत्यांनी राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ काम केले आहे. सत्तेतील अनुभव, संघटनात्मक कौशल्य आणि राजकीय परिस्थितीचा अंदाज घेण्याची क्षमता या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. अशा नेत्यांना डावलून काही मोजक्या व्यक्तींच्या माध्यमातून पक्ष चालविण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा जर खरी असेल, तर ती पक्षासाठी धोक्याची घंटा आहे. कोणत्याही राजकीय पक्षात नव्या पिढीला संधी मिळालीच पाहिजे. युवा नेतृत्व पुढे येणे ही काळाची गरज आहे. मात्र, युवा नेतृत्वाचा उदय हा ज्येष्ठ नेत्यांच्या अनुभवाला नाकारून होऊ शकत नाही. नव्या पिढीने नेतृत्व स्वीकारताना जुन्या पिढीचा अनुभव आणि कार्यकर्त्यांचा विश्वास सोबत घेणे आवश्यक असते. अन्यथा नेतृत्वाचा विस्तार न होता अंतर्गत संघर्ष वाढतो. पार्थ पवार यांच्या पक्षातील वाढत्या हस्तक्षेपाबाबत नाराजी व्यक्त होत असल्याच्या बातम्या याच संदर्भात महत्त्वाच्या ठरतात. पक्षातील महत्त्वाच्या पदांवरील नियुक्त्या, संघटनात्मक निर्णय आणि नेत्यांशी समन्वय या बाबी कोणत्याही एका व्यक्तीच्या पसंतीपुरत्या मर्यादित राहू शकत नाहीत. पक्ष हा कोणाच्या वैयक्तिक मालकीचा नसतो. तो हजारो कार्यकर्त्यांच्या कष्टातून, मतदारांच्या विश्वासातून आणि अनेक वर्षांच्या राजकीय प्रवासातून उभा राहत असतो. त्यामुळे पक्षातील पदाधिकारी निवडताना गुणवत्ता, अनुभव, जनाधार आणि संघटनात्मक योगदान यांचा विचार होणे अपेक्षित आहे. केवळ जवळीक किंवा वैयक्तिक निष्ठा हा नियुक्तीचा निकष बनला, तर कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण होणे स्वाभाविक आहे. राष्ट्रवादीच्या सध्याच्या राजकीय परिस्थितीत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महायुतीतील समन्वय. भाजप आणि राष्ट्रवादी हे सत्तेतील सहकारी पक्ष आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रवादीतील अंतर्गत संघर्षाचा परिणाम केवळ त्या पक्षापुरता मर्यादित राहत नाही. मंत्रिमंडळातील निर्णय, खातेवाटप, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय समीकरणे आणि आगामी निवडणुकांतील रणनीती यावरही त्याचे पडसाद उमटू शकतात. त्यामुळे भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाला राष्ट्रवादीतील अंतर्गत गोंधळाची चिंता वाटत असल्याची चर्चा राजकीयदृष्ट्या महत्त्वाची आहे. मित्रपक्षाला सूचना देता येतात; पण त्या पक्षाचे नेतृत्व कोण करणार, निर्णय कोण घेणार आणि संघटना कशी चालवायची, हे ठरविण्याचा अंतिम अधिकार त्या पक्षाच्या नेतृत्वाकडेच असला पाहिजे.

वाढदिवसाचा जल्लोष टाळत बळीराजासाठी मदतीचा हात; मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५ लाखांचा धनादेश!

जन सम्राट टाईम्स

भडगावा प्रतिनिधी: राज्यात यंदा दुष्काळाचे सावट असून शेतकरी संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून तोच पैसा गरजू शेतकऱ्यांच्या मदतीसाठी द्यावा, असे संवेदनशील आवाहन कार्यसम्राट आमदार किशोर आप्पा पाटील यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत भडगावमध्ये शिवसेना पदाधिकारी, नगरसेवक आणि स्व. बापुजी युवा फाउंडेशनच्या वतीने एकूण पाच लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द करण्यात आली. पुष्पगुच्छ, केक आणि बॅनरच्या खर्चाला फाटा दरवर्षी शिवसेना, युवासेना आणि स्व. बापुजी युवा फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धांच्या माध्यमातून आमदार किशोर आप्पा पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा केला जातो. मात्र, यंदा दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पुष्पगुच्छ, केक, बॅनर आणि इतर उत्सवी खर्चाला फाटा देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा निर्णय घेण्यात आला. शिवसेना पदाधिकारी आणि फाउंडेशनकडून प्रत्येकी अडीच लाखांची मदत आमदारांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत भडगाव नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, गटनेते आणि शिवसेनेच्या सर्व नगरसेवक-नगरसेविकांच्या वतीने अडीच लाख रुपये, तर स्व. बापुजी युवा फाउंडेशनच्या वतीने अडीच लाख रुपये, असे एकूण पाच लाख रुपयांचे धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्यात आले. प्रांताधिकारी भूषण आहिरे यांच्याकडे धनादेश सुपूर्द पाचोरा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात प्रांताधिकारी भूषण आहिरे यांच्याकडे सदर धनादेश सुपूर्द करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्ष राजेंद्र जिभू पाटील, शिवसेना गटनेते लखीचंद भाऊ पाटील, जहागीर मालचे, नगरसेवक जगन भोई, संतोष महाजन, आसिम मिर्झा, अतुल परदेशी, देवा आहिरे, जितेंद्र आचारी, राहुल ठाकरे, अलीम शहा, सौरभ देशमुख, शुभम भोसले, शेख वकार, प्रशांत सोनवणे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. 'वाढदिवसाचा जल्लोष नाही, बळीराजाच्या मदतीचा हात!' वाढदिवसाचा थाट बाजूला ठेवून संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याचा हा निर्णय सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडवणारा ठरला आहे. संकटाच्या काळात उत्सव साजरा करण्यापेक्षा अडचणीत सापडलेल्या बांधवांच्या पाठीशी उभे राहणे अधिक महत्त्वाचे असते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. 'वाढदिवसाचा जल्लोष नाही, बळीराजाच्या मदतीचा हात!' या संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकी आणि शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करणारा ठरला.

विकासकामांच्या अभावामुळे माळेगाव पिंपरीतील ग्रामस्थ आक्रमक!

आठ दिवसांत कामे सुरू न झाल्यास ग्रामपंचायतीला कुलूप ठोकून धरणे आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

माळेगाव पिंपरी। प्रतिनिधी : ग्रुप ग्रामपंचायत माळेगाव पिंपरी, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर अंतर्गत येणाऱ्या जनरल व दलित वस्त्यांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत विकासकामे झाली नसल्याचा आरोप करीत ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. रस्ते, गटारी, पाणीपुरवठा आणि युवकांसाठी आवश्यक सुविधांच्या मागण्यांसाठी ग्रामस्थांनी दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे. आठ दिवसांत मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून धरणे आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. रस्ते, गटारी आणि पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात जनरल व दलित वस्तीतील मुख्य रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याची मागणी केली आहे. पावसाळ्यात रस्त्यांवर चिखल साचत असल्याने नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागतो. सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पक्क्या गटारी व नाल्यांची बांधणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.



जल जीवन मिशनअंतर्गत प्रत्येक घराला स्वतंत्र नळजोडणी देऊन नियमित पाणीपुरवठा करावा, तसेच गावातील प्रत्येक चौकात ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी सिमेंटची बाकडी बसवावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. युवकांसाठी वाचनालय आणि व्यायामशाळेची मागणी गावातील युवकांना स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी आवश्यक पुस्तकांसह सुसज्ज सार्वजनिक वाचनालय मंजूर करावे. तसेच युवकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ओपन जिम किंवा व्यायामशाळा उभारावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निकृष्ट विकासकामांच्या चौकशीची मागणी ग्रामपंचायत हद्दीत ठेकेदार अविनाश पाटील यांनी केलेली काही विकासकामे मंजूर अंदाजपत्रकानुसार झालेली नसून त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कामांची तांत्रिक तपासणी करून चौकशी करावी आणि संबंधित ठेकेदाराला यापुढील कामे देऊ नयेत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या आरोपांची प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. आठ दिवसांची मुदत; अन्यथा ग्रामपंचायतीला कुलूप या निवेदनाची प्रत गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद तसेच सरपंच व ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत माळेगाव पिंपरी यांना देण्यात आली आहे. दिलेल्या मागण्यांवर आठ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून धरणे आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

नाथ संप्रदायाच्या 'आदेश' दिवाळी अंकाचे दिमाखात प्रकाशन!

जन सम्राट टाईम्स

नाशिक | प्रतिनिधी : नाथ संप्रदायाच्या वतीने दरवर्षी प्रकाशित करण्यात येणाऱ्या 'आदेश' दिवाळी अंकाचे मराठी आणि हिंदी भाषेतील प्रकाशन रविवार, १ नोव्हेंबर रोजी नाशिक येथील पंचवटी परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. श्री काळाराम मंदिरामागील शनी चौकाजवळील स्वाद हॉल, भाविदिशा अपार्टमेंट येथे मान्यवरांच्या हस्ते या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. विशेष अतिथी श्री काळाराम मंदिर संस्थानचे पुजारी नरेश जयराम पुजारी आणि सचिन गजानन पुजारी, माजी जिल्हाधिकारी रघुनाथ राठोड तसेच साहित्य परिषद अध्यक्ष व ज्येष्ठ लेखक नवनाथ गायकर यांची प्रमुख उपस्थिती होती. नाथ संप्रदायाच्या साहित्याचे महत्त्व अधोरेखित यावेळी डॉ. गजानन पाटील आणि माजी जिल्हाधिकारी रघुनाथ राठोड यांनी नाथ संप्रदायाची परंपरा, विचारधारा आणि साहित्याचे महत्त्व विशद केले. कार्यकारी मंडळासह नाथ बंधू-भगिनींची उपस्थिती कार्यक्रमाला कार्यकारी मंडळातील भगवाननाथ मोरे, राजू घुले, अनिल भुसारी, नरेशनाथ मोरे, निलेशनाथ मोरे, भरतकुमार जोगी, मधुकरनाथ चव्हाण, विशालनाथ जोगी, शरदनाथ पंजे, सुनील पंजे, माणिकनाथ कानडे, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

गाढोदा येथे वर्षावास प्रवचनमालेचा उत्साहात सांगता!

संतोष व शिला सपकाळे यांच्याकडून बुद्धविहारासाठी जागा दान!

जन सम्राट टाईम्स

गाढोदा, जळगाव। प्रतिनिधी: भारतीय बौद्ध महासभा, जळगाव जिल्हा पूर्व अंतर्गत जळगाव तालुका शाखेच्या वतीने रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी गाढोदा येथील पंचशील नगर या धम्मनगरीत आयोजित वर्षावास प्रवचनमालेचा सांगता सोहळा उत्साहात आणि मंगलमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यात गाढोदा महिला ग्रामशाखेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. विशेष म्हणजे, संतोष सपकाळे आणि शिलाताई सपकाळे यांनी आपली राहती जागा बुद्धविहारासाठी दान देण्याची घोषणा करून धम्मकार्याला मोलाचे योगदान दिले. त्यांच्या या दानशूर निर्णयाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. महिला ग्रामशाखेच्या फलकाचे अनावरण महाराष्ट्र राज्य पर्यटन सचिव डॉ. के. वाय. सुरवाडे गुरुजी आणि महिला जिल्हाध्यक्ष प्रियंकाताई अहिरे यांच्या हस्ते गाढोदा महिला ग्रामशाखेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जळगाव तालुकाध्यक्ष राजेश नामदेव इंगळे होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप, धूप व पुष्पपूजेने झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बुद्धवंदना करण्यात आली. जिल्हा हिशेब तपासनीस पी. डी. सपकाळे यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील दिले. यावेळी राज्य, जिल्हा आणि तालुका पदाधिकारी, प्रवचनकार तसेच नूतन माजी श्रामणेर यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रवचनकार व धम्मकार्यकर्त्यांचा गौरव प्रवचनकार यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. १) आद. सुनीताताई वानखेडे (महिला जिल्हा उपा.), आद. रविंद्र वानखेडे (जिल्हा संस्कार उपा.), ३) आद. उदय सपकाळे (लेखक, समीक्षक), ४) आद. बी एस पवार गुरुजी (जळगाव तालुका प्रभारी तथा जिल्हा संघटक), ५) आद. ज्योतिताई भालेराव (केंद्रीय शिक्षिका), ६) आद. बाबुराव वाघ (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता) ७) आद. विद्याताई झनके (जिल्हा पर्यटन सचिव), ८) आद. जयपाल धुरंधर (तालुका पर्यटन सचिव), ९) आद. अशोक तिडके (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता), १०) आद. रविंद्र मोरे (मुक्ताईनगर तालुकाध्यक्ष), ११) आद. डॉ प्रकाश वानखेडे (प्रवचन



मालिकेत पुष्पाचे आयोजन),१२) आद. पेमाभाऊ सोनवणे (वर्षावास मारोपासाठी ₹५०००/ रोख दान), १३) आद. शिलाताई सपकाळे/ संतोष सपकाळे (विहारासाठी जागा दान), १४) आद. पुष्पाताई सपकाळे आणि आद. पी डी सपकाळे (धम्म रुजविण्यासाठी महत्वपूर्ण योगदान), १५) आद. कविताताई सपकाळे आणि आद गौतम सपकाळे (महत्वपूर्ण योगदान), १६) गाढोदा महिला ग्रामशाखा (महत्वपूर्ण योगदान), १७) आद. वंदनाताई वानखेडे (संपूर्ण सन्मानचिन्ह खर्च), १८) आद. सागर सदावर्ते (प्रवचनकार प्रवास खर्च). धम्मविचार,सामाजिक एकतेचा संदेश कार्यक्रमात डॉ. के. वाय. सुरवाडे गुरुजी, प्रा. डॉ. संजीव साळवे, रविंद्र वानखेडे, भीमराव पवार, बी. एस. पवार गुरुजी, उदय सपकाळे, बाबुराव वाघ आणि रविंद्र मोरे गुरुजी यांनी शुभेच्छापर व मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. समाजप्रबोधनाच्या माध्यमातून धम्मविचारांचा प्रसार, सामाजिक एकता आणि संघटनात्मक कार्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. डी. सपकाळे यांनी केले. अध्यक्षीय भाषणातून राजेश नामदेव इंगळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शेवटी सरणत्तय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. गाढोदा येथील उपासक-उपासिकांच्या वतीने उपस्थितांसाठी भोजनदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या सोहळ्याला जिल्हा,तालुका व महिला शाखांचे पदाधिकारी, बौद्धाचार्य, माजी श्रामणेर, ग्रामशाखेचे पदाधिकारी, पंचक्रोशीतील उपासक-उपासिका तसेच बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुद्धविहारासाठी जागादानाची घोषणा आणि महिला ग्रामशाखेच्या फलकाचे अनावरण या दोन महत्त्वपूर्ण उपक्रमांमुळे गाढोदा येथील वर्षावास सांगता सोहळा विशेष ठरला.

दानशूर निर्णयाचे उपस्थितांनी कौतुक केले

भारतीय बौद्ध महासभा, जळगाव जिल्हा पूर्व अंतर्गत जळगाव तालुका शाखेच्या वतीने रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी गाढोदा येथील पंचशील नगर या धम्मनगरीत आयोजित वर्षावास प्रवचनमालेचा सांगता सोहळा उत्साहात आणि मंगलमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यात गाढोदा महिला ग्रामशाखेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. विशेष म्हणजे, संतोष सपकाळे आणि शिलाताई सपकाळे यांनी आपली राहती जागा बुद्धविहारासाठी दान देण्याची घोषणा करून धम्मकार्याला मोलाचे योगदान दिले. त्यांच्या या दानशूर निर्णयाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. महिला ग्रामशाखेच्या फलकाचे अनावरण महाराष्ट्र राज्य पर्यटन सचिव डॉ. के. वाय. सुरवाडे गुरुजी आणि महिला जिल्हाध्यक्ष प्रियंकाताई अहिरे यांच्या हस्ते गाढोदा महिला ग्रामशाखेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. जळगाव तालुकाध्यक्ष राजेश नामदेव इंगळे होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप, धूप व पुष्पपूजेने झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बुद्धवंदना करण्यात आली. जिल्हा हिशेब तपासनीस पी. डी. सपकाळे यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील दिले. यावेळी राज्य, जिल्हा आणि तालुका पदाधिकारी, प्रवचनकार तसेच नूतन माजी श्रामणेर यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रवचनकार व धम्मकार्यकर्त्यांचा गौरव प्रवचनकार यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

आयुष्यमान भारत योजनेचा लाभ घेण्यासाठी स्वयंस्फूर्त सहभाग घ्यावा!

जन सम्राट टाईम्स



जळगाव। प्रतिनिधी : आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही नागरिकाला वैद्यकीय उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी शासनाच्या आयुष्यमान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांनी घ्यावा. प्रत्येक पात्र कुटुंबाने आपले आयुष्यमान कार्ड काढून घ्यावे आणि या योजनांच्या अंमलबजावणीत स्वयंस्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समितीचे अशासकीय सदस्य मुकुंद गोसावी यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात समितीची बैठक आयुष्यमान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांच्या संयुक्त अंमलबजावणीसंदर्भात जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समितीची बैठक नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. समितीचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पात्र रुग्णांना मोफत व दर्जेदार उपचार द्या! या बैठकीत मुकुंद गोसावी यांनी योजनेशी संलग्न रुग्णालयांनी पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार दर्जेदार वैद्यकीय सुविधा आणि उपचार मोफत उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी केली. योजनेचा लाभ घेताना रुग्णांना अनावश्यक त्रास किंवा अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी रुग्णालय प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले. आयुष्यमान कार्ड काढण्यापूर्वी कागदपत्रे अद्ययावत करा आयुष्यमान भारत योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र नागरिकांकडे आयुष्यमान कार्ड असणे आवश्यक आहे. कार्ड काढण्यापूर्वी कुटुंबाची शिधापत्रिका डिजिटल स्वरूपात अद्ययावत करून घ्यावी. कुटुंबातील नवीन सदस्यांची नावे शिधापत्रिकेत समाविष्ट करून माहिती अपडेट करावी. तसेच आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांकासंबंधी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे गोसावी यांनी सांगितले. पांढरी, केशरी किंवा पिवळी शिधापत्रिका असलेल्या पात्र कुटुंबांनी योजनेच्या लाभासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी. यासाठी आरोग्य मित्र, आशा सेविका, आपले सरकार सेवा केंद्र (सीएससी सेंटर) तसेच रास्त भाव दुकानदार यांच्याकडून नागरिकांना मार्गदर्शन व सहकार्य मिळू शकते. ७० वर्षांवरील ज्येष्ठांनीही वय वंदना कार्ड काढावे वयाची ७० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या आयुष्मान वय वंदना कार्डचाही लाभ संबंधित ज्येष्ठांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाविरोधात कर्मचाऱ्यांचा दोन दिवसांचा देशव्यापी संप!

जन सम्राट टाईम्स



परभणी । प्रतिनिधी : आयडीबीआय बँकेच्या प्रस्तावित खासगीकरणाला विरोध करण्यासाठी देशभरातील बँकेच्या अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी २ व ३ नोव्हेंबर रोजी दोन दिवसांचा देशव्यापी संप पुकारला आहे. या संपामुळे बँकेच्या दैनंदिन कामकाजावर आणि ग्राहकांना मिळणाऱ्या सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. खासगीकरणाच्या प्रस्तावाला कर्मचारी संघटनांचा विरोध केंद्र रकार आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून (एलआयसी) आयडीबीआय बँकेतील हिस्सा कॅनडातील फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्जशी संबंधित कंपनीला विकण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावाला बँकेतील अधिकारी व कर्मचारी संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. बँकेचे सार्वजनिक क्षेत्रातील स्वरूप कायम ठेवण्याच्या मागणीसाठी हा संप पुकारण्यात आला आहे. १ टक्के भागभांडवल कायम ठेवण्याची मागणी या संपाद्वारे माध्यमातून सरकारने आयडीबीआय बँकेतील किमान ५१ टक्के भागभांडवल कायम ठेवावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने सार्वभौम हमी द्यावी, अशीही मागणी संघटनांनी केली आहे. कर्मचाऱ्यांच्या हक्कांबाबत लेखी हमी द्या विद्यमान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, वेतन, निवृत्तिवेतन आणि कल्याणकारी योजनांमध्ये खासगीकरणामुळे प्रतिकूल बदल होऊ नयेत, यासाठी सरकारने लेखी हमी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय आरक्षण धोरणाचे संरक्षण करावे आणि सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचे सार्वजनिक क्षेत्रातील स्वरूप कायम ठेवावे, अशी भूमिका संघटनांनी मांडली आहे. आयडीबीआय बँकेच्या भवितव्याबरोबरच ठेवीदारांचे हित आणि कर्मचाऱ्यांच्या सेवा सुरक्षिततेचा प्रश्न या संपामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. आयडीबीआय बँकेच्या प्रस्तावित खासगीकरणाला विरोध करण्यासाठी देशभरातील बँकेच्या अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी २ व ३ नोव्हेंबर रोजी दोन दिवसांचा देशव्यापी संप पुकारला आहे. या संपामुळे बँकेच्या दैनंदिन कामकाजावर आणि ग्राहकांना मिळणाऱ्या सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. खासगीकरणाच्या प्रस्तावाला कर्मचारी संघटनांचा विरोध केंद्र रकार आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून (एलआयसी) आयडीबीआय बँकेतील हिस्सा कॅनडातील फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्जशी संबंधित कंपनीला विकण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावाला बँकेतील अधिकारी व कर्मचारी संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला आहे.

वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून पुस्तकांची अनोखी भेट!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव (प्रतिनिधी): आजकाल वाढदिवस म्हटला की हारतुरे, पुष्पगुच्छ, फटाक्यांची आतषबाजी आणि मोठ्या खर्चाचे चित्र पाहायला मिळते. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन धरणगावात वाढदिवस साजरा करण्याचा एक वेगळा आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते तथा संपर्कप्रमुख गुलाबराव वाघ यांच्या वाढदिवसानिमित्त समर्पण बहुउद्देशीय संस्था, महाराष्ट्र राज्य, धरणगाव यांच्या वतीने गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होते?' या वैचारिक ग्रंथाच्या ५९ प्रतींचे वाटप करण्यात आले. हारतुरे, फटाक्यांऐवजी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्राधान्य महाराष्ट्रात नैसर्गिक संकट आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असताना वाढदिवसानिमित्त महागड्या भेटवस्तूंवर पैसा खर्च करण्याऐवजी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावावा, असे आवाहन गुलाबराव वाघ यांनी यापूर्वीच केले होते. वाढदिवसानिमित्त भेटवस्तू द्यायचीच असेल, तर विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडणाऱ्या वह्या, पुस्तके आणि बॉलपेन यांसारख्या शैक्षणिक साहित्याला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली होती. या आवाहनामागे केवळ वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचा विचार नसून समाजातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाप्रती प्रत्येकाने संवेदनशील असावे, हा व्यापक सामाजिक हेतू होता. कारण वाढदिवसानिमित्त होणारा काही तासांचा आनंद संपून जातो; मात्र विद्यार्थ्यांच्या हातात दिलेले पुस्तक त्यांना आयुष्यभर ज्ञान आणि विचारांची शिदोरी देऊ शकते. 'शिवाजी कोण होते?' ग्रंथाच्या ५९ प्रतींचे वाटप यासामाजिक भावनेतून समर्पण बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होते?' या ग्रंथाच्या ५९ प्रतींचे वाटप करून गुलाबराव वाघ यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या उपक्रमातून वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासोबतच वैचारिक जागृती आणि विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती या उपक्रमावेळी समर्पण बहुउद्देशीय संस्थेचे राज्याध्यक्ष बापुसो. महेंद्र तायडे, जिल्हा भाजपचे नेते ॲड. संजय महाजन, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहराध्यक्ष लक्ष्मणराव पाटील, सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील, राष्ट्रीय किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष गोरखनाथ देशमुख, शिवसेना (उबाठा) जिल्हा उपाध्यक्ष महेंद्र महाजन, बुद्धिष्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे तालुकाध्यक्ष निलेश पवार, शहरप्रमुख तथा नगरसेवक भागवत चौधरी, काँग्रेसचे नंदलाल महाजन, नगरसेवक मोनू शिरसाट, लक्ष्मण महाजन, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष माळी, विजय सोनवणे, शरद शिरसाट, अशोक झुंझाररव, संतोष सोनवणे, अजय सोनवणे, गोटू रोकडे, भैय्या धनगर, हिंमत पाटील, हेमंत माळी सर, आबासाहेब वाघ, राहुल रोकडे यांच्यासह समर्पण बहुउद्देशीय संस्थेचे सदस्य आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. 'वाढदिवसाचा आनंद ज्ञानदानातून!' वाढदिवस साजरा करण्याच्या पारंपरिक पद्धतीला सामाजिक बांधिलकीची जोड देणारा हा उपक्रम धरणगावात चर्चेचा विषय ठरला.

दैनिक जनसम्राट टाइम्सचे सुरेश जगताप यांना 'भारत विश्वरत्न पुरस्कार'!

जन सम्राट टाईम्स



कल्याण। प्रतिनिधी: सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यासाठी इंडियन कॉपीराइट प्रोटेक्शन अँटी पायरसी सेल, मुंबई यांच्या वतीने आयोजित 'भारत विश्वरत्न पुरस्कार २०२६' सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. या सोहळ्यात दैनिक जनसम्राट टाइम्सचे ठाणे जिल्हा प्रतिनिधी सुरेश भजन जगताप यांना त्यांच्या निस्वार्थ समाजसेवेची आणि पत्रकारितेतील सत्यनिष्ठ, निर्भीड लेखणीची दखल घेत 'भारत विश्वरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी त्यांना 'लेखणी सम्राट' या किताबानेही सन्मानित करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्य तपासी अधिकारी रामजीत (जितू) महादेव गुप्ता यांनी राज्यातील विविध भागांतील गुणवंत व्यक्तींची निवड केली होती. या निवड प्रक्रियेत सर्वानुमते दैनिक जनसम्राट टाइम्सचे सुरेश जगताप यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. कल्याणमध्ये दिमाखदार पुरस्कार सोहळा रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता कल्याण पश्चिम येथील के. एम. अग्रवाल कॉलेजच्या वातानुकूलित सभागृहात, पडघा रोड, खडकपाडा येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भक्तिगीताने झाली. त्यानंतर देव-अवतार आणि महापुरुषांचे हुबेहूब सादरीकरण तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. राज्यभरातून आलेल्या मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळ्याला विशेष रंगत आली. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण यावेळी इंडियन आर्मीचे सुभेदार महेंद्र गवई, भारुड सम्राट गोविंद महाराज गायकवाड, विकास खर्चे, अभिनेत्री नेहा जोशी, अनिता गुजर आणि डॉ. जितेंद्र जोशी आदी मान्यवरांच्या हस्ते सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, पत्रकारिता तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. दैनिक जनसम्राट टाइम्सचे प्रतिनिधी सुरेश जगताप यांना 'भारत विश्वरत्न पुरस्कार' आणि 'लेखणी सम्राट' किताब मिळाल्याने कल्याण-डोंबिवलीसह ठाणे जिल्ह्यातील पत्रकार बांधव,सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नशिराबादमध्ये पाणीटंचाईचे सावट; पाणीपुरवठ्याच्या वेळेत 20 मिनिटांची कपात!

नगरपरिषदेचे नागरिकांना सहकार्याचे आवाहन; भविष्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता

जन सम्राट टाईम्स



नशिराबाद। प्रतिनिधी: शहरात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने उपलब्ध पाणीसाठा झपाट्याने घटत आहे. भविष्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन नशिराबाद नगरपरिषदेने पाणीपुरवठ्याच्या वेळेत २० मिनिटांची कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे शहरात केवळ एक तास पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीचे सभापती कीर्तीकांत पंडित चौबे यांनी दिली. १ नोव्हेंबरपासून निर्णयाची अंमलबजावणी उपलब्ध पाणीसाठा पुढील उन्हाळ्यापर्यंत पुरावा, या उद्देशाने नगरपरिषदेच्या सार्वजनिक पाणीपुरवठा व जलनिस्सारण विभागामार्फत हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रभारी नगराध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार १ नोव्हेंबर २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत पाणीपुरवठ्याच्या वेळेत कपात लागू राहणार आहे. पाणी बचतीसाठी नगरपरिषदेचे आठ महत्त्वाचे आवाहन संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी नगरपरिषदेने नागरिकांना पाणी बचतीच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले आहे. पाण्याचा जपून वापर करा : गरजेपुरतेच पाणी वापरावे. नळ विनाकारण उघडा ठेवू नये. गळके नळ दुरुस्त करा : घरातील गळके नळ आणि पाण्याच्या टाक्या तातडीने दुरुस्त करून घ्याव्यात. पिण्याचे पाणी वाया घालवू नका : पिण्याच्या पाण्याचा वापर बागकाम, वाहने धुणे किंवा अंगण स्वच्छ करण्यासाठी टाळावा. पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण पाणी साठवून भूजल पातळी वाढविण्यास हातभार लावावा. पाइपलाइन गळतीची माहिती द्या : रस्त्यावर पाइपलाइन फुटलेली किंवा गळती होत असल्याचे आढळल्यास तातडीने नगरपरिषद कार्यालयाला कळवावे. फिल्टरच्या पाण्याचा पुनर्वापर जलसाक्षरता निर्माण करा : लहान मुलांना पाणी बचतीचे महत्त्व समजावून सांगावे. सार्वजनिक कार्यक्रमांत अपव्यय टाळा : लग्नसमारंभ आणि इतर कार्यक्रमांमध्ये पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. 'पाणी वाचवा, भविष्य वाचवा!' संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकाचे सहकार्य महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर केल्यास उपलब्ध जलसाठा अधिक काळ टिकविण्यास मदत होईल. त्यामुळे नागरिकांनी पाणी बचतीच्या नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीचे सभापती कीर्तीकांत पंडित चौबे यांनी केले

देगलूरमध्ये लोकशाहीच्या रक्षणासाठी एल्गार!

जन सम्राट टाईम्स

देगलूर । प्रतिनिधी: लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणासाठी देगलूर येथे सुरू असलेल्या भव्य जनआंदोलनाचा १७ वा दिवस उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या शेजारील 'प्रति जंतर-मंतर' मैदानावर हे आंदोलन सुरू असून, लोकशाहीच्या रक्षणासाठी नागरिकांनी एकजुटीने पुढे येण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. आंदोलनस्थळी 'लोकशाही वाचवा, संविधान वाचवा', 'ज्ञानेश कुमार राजीनामा दो', 'इन्कलाब जिंदाबाद', 'जय भीम, जय भारत' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनाला विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि युवा कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावून पाठिंबा दर्शविला. यावेळी युवा नेते बंटी उर्फ शशिकांत कांबळे, इरफान भाई, आदित्य मसुरे, योगेश उप्पलवार, युवा नेते मंगलदीप सिताफुले तसेच बॉबी उर्फ प्रबुद्ध वाघमारे जाहुरकर उपस्थित होते. घटनात्मक मूल्यांच्या जपणुकीचा संदेश प्राचार्य, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक आणि राज्यघटना अभ्यासक संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर यांनी आंदोलनस्थळी सदिच्छा भेट देत उपस्थितांशी संवाद साधला. अशा जनआंदोलनांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला १७ दिवस पूर्ण झाल्याने आंदोलनकर्त्यांचा उत्साह कायम असल्याचे चित्र दिसून आले. विविध मान्यवरांच्या उपस्थितीमुळे आंदोलनाला अधिक बळ मिळत असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

स्वच्छ ऊर्जा क्रांतीला बळ देणार बलसाणे पारेषण प्रकल्प; धुळे-नाशिकमध्ये 210 किलोमीटरचे वीज जाळे उभारणार!

औद्योगिक विकास, गुंतवणूक आणि ऊर्जा सुरक्षेला चालना मिळण्याची अपेक्षा

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणाला गती देण्यासाठी सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीबरोबरच सक्षम वीज पारेषण यंत्रणा उभारणेही तितकेच महत्त्वाचे आहे. याच पार्श्वभूमीवर धुळे परिसरात उभारला जाणारा बलसाणे पॉवर ट्रान्समिशन प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. धुळे आणि नाशिक जिल्ह्यांतून सुमारे २१० किलोमीटर लांबीचे पारेषण जाळे उभारण्याचे नियोजन असून, यामुळे प्रादेशिक वीज पारेषण व्यवस्था मजबूत होण्यास आणि नवीकरणीय ऊर्जेचे राष्ट्रीय वीज ग्रीडमध्ये एकत्रीकरण करण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. देशात सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पांची संख्या वाढत असताना या ऊर्जेचे कार्यक्षमतेने वहन करणे हे मोठे आव्हान बनले आहे. अनेक नवीकरणीय ऊर्जा निर्मिती केंद्रे ही प्रमुख वीज वापराच्या ठिकाणांपासून दूर आहेत. त्यामुळे उच्च क्षमतेच्या पारेषण मार्गिका उभारणे आवश्यक ठरते. आधुनिक पारेषण जाळ्यामुळे स्वच्छ ऊर्जा राष्ट्रीय ग्रीडपर्यंत पोहोचविणे, वीज वहन क्षमता वाढविणे आणि पुरवठ्याची विश्वासार्हता बळकट करणे शक्य होते. औद्योगिक विकासाला मिळणार ऊर्जा बळ बलसाणे पॉवर ट्रान्समिशन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्रातील औद्योगिक आणि आर्थिक विकासाला पूरक ऊर्जा पायाभूत सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पामुळे नर्डाना ग्रोथ सेंटर, धुळे-अवधान औद्योगिक पट्टा, प्रस्तावित शिरपूर औद्योगिक वसाहत तसेच धुळे जिल्ह्यातील नियोजित लॉजिस्टिक सुविधांच्या भविष्यातील वीज गरजा पूर्ण करण्यास मदत होऊ शकते. विश्वासार्ह वीजपुरवठा हा औद्योगिक गुंतवणुकीसाठी महत्त्वाचा घटक आहे. सक्षम पारेषण व्यवस्था निर्माण झाल्यास उत्पादन उद्योग, औद्योगिक समूह आणि नव्याने विकसित होणाऱ्या आर्थिक केंद्रांना त्याचा लाभ मिळू शकतो. परिणामी उत्तर महाराष्ट्रात औद्योगिक विस्तार, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. 'रेसोनिया'कडून आधुनिक पारेषण सुविधांवर भर पारेषण क्षेत्रात कार्यरत असलेल्या 'रेसोनिया' कंपनीकडून भारताच्या व्यापक ऊर्जा संक्रमणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आधुनिक पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर दिला जात



आहे. वाढती वीज मागणी आणि नवीकरणीय ऊर्जेचे एकत्रीकरण लक्षात घेता स्वच्छ ऊर्जा निर्मिती आणि तिचे कार्यक्षम वितरण यांना जोडणारी सक्षम यंत्रणा उभारणे ही भविष्यातील ऊर्जा सुरक्षेची गरज बनली आहे. स्थानिक नागरिकांचा सहभागही महत्त्वाचा मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या उभारणीत तांत्रिक गुणवत्ता जितकी महत्त्वाची असते, तितकाच स्थानिक नागरिकांचा विश्वास आणि सहभागही आवश्यक असतो. शेतकरी, जमीनमालक आणि स्थानिक भागधारकांशी पारदर्शक संवाद साधणे, त्यांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करणे आणि नुकसानभरपाईबाबत स्पष्टता ठेवणे या बाबी प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण ठरतात. पालघर आणि भिवंडी परिसरातील खावडा IV-C पारेषण प्रकल्पाच्या अनुभवातून स्थानिक भागधारकांशी थेट संवाद, तक्रार निवारण आणि नुकसानभरपाईबाबत पारदर्शकता राखण्याचे महत्त्व अधोरेखित झाल्याचे कंपनीकडून नमूद करण्यात आले आहे. बलसाणे प्रकल्पातही तांत्रिक उत्कृष्टतेसोबत स्थानिक समुदायांचा अर्थपूर्ण सहभाग साधण्यावर भर असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. स्वच्छ ऊर्जा आणि प्रादेशिक विकासाला जोडणारा प्रकल्प भारत स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेवर आधारित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत असताना सक्षम पारेषण मार्गिका या ऊर्जा संक्रमणाचा कणा ठरणार आहेत. बलसाणे प्रकल्पामुळे धुळे-नाशिक परिसरातील वीज पायाभूत सुविधा अधिक सक्षम होण्यासह औद्योगिक विकास आणि प्रादेशिक आर्थिक प्रगतीला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्वच्छ ऊर्जा, ऊर्जा सुरक्षा आणि स्थानिक विकास यांचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरू शकतो. भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणाला गती देण्यासाठी सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीबरोबरच सक्षम वीज पारेषण यंत्रणा उभारणेही तितकेच महत्त्वाचे आहे. याच पार्श्वभूमीवर धुळे परिसरात उभारला जाणारा बलसाणे पॉवर ट्रान्समिशन प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. धुळे आणि नाशिक जिल्ह्यांतून सुमारे २१० किलोमीटर लांबीचे पारेषण जाळे उभारण्याचे नियोजन असून, यामुळे प्रादेशिक वीज पारेषण व्यवस्था मजबूत होण्यास आणि नवीकरणीय ऊर्जेचे राष्ट्रीय वीज ग्रीडमध्ये एकत्रीकरण करण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. देशात सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पांची संख्या वाढत असताना या ऊर्जेचे कार्यक्षमतेने वहन करणे हे मोठे आव्हान बनले आहे. अनेक नवीकरणीय ऊर्जा निर्मिती केंद्रे ही प्रमुख वीज वापराच्या ठिकाणांपासून दूर आहेत. त्यामुळे उच्च क्षमतेच्या पारेषण मार्गिका उभारणे आवश्यक ठरते. आधुनिक पारेषण जाळ्यामुळे स्वच्छ ऊर्जा राष्ट्रीय ग्रीडपर्यंत पोहोचविणे, वीज वहन क्षमता वाढविणे आणि पुरवठ्याची विश्वासार्हता बळकट करणे शक्य होते. औद्योगिक विकासाला मिळणार ऊर्जा बळ बलसाणे पॉवर ट्रान्समिशन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्रातील औद्योगिक आणि आर्थिक विकासाला पूरक ऊर्जा पायाभूत सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पामुळे नर्डाना ग्रोथ सेंटर, धुळे-अवधान औद्योगिक पट्टा, प्रस्तावित शिरपूर औद्योगिक वसाहत तसेच धुळे जिल्ह्यातील नियोजित लॉजिस्टिक सुविधांच्या भविष्यातील वीज गरजा पूर्ण करण्यास मदत होऊ शकते. विश्वासार्ह वीजपुरवठा हा औद्योगिक गुंतवणुकीसाठी महत्त्वाचा घटक आहे. सक्षम पारेषण व्यवस्था निर्माण झाल्यास उत्पादन उद्योग, औद्योगिक समूह आणि नव्याने त्याचा लाभ मिळू शकतो. परिणामी उत्तर महाराष्ट्रात औद्योगिक विस्तार, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. 'रेसोनिया'कडून आधुनिक पारेषण सुविधांवर भर पारेषण क्षेत्रात कार्यरत असलेल्या 'रेसोनिया' कंपनीकडून भारताच्या व्यापक ऊर्जा संक्रमणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आधुनिक पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर दिला जात आहे.

जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करा!

जन सम्राट टाईम्स

अंबड, जालना | प्रतिनिधी : जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे अंबड तालुक्यात पाणीटंचाई आणि रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असून, भूमिहीन शेतमजूर आणि गोरगरीब कुटुंबांच्या हाताला काम नसल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही गंभीर बनला आहे. शासनाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आंबेडकरी जनमंच सामाजिक संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष विलास मस्के यांनी केली आहे. गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी अंबड तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी पैठण धरणातून गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्यात यावे, अशी प्रमुख मागणी विलास मस्के यांनी केली आहे. नदीपात्रात पाणी उपलब्ध झाल्यास परिसरातील पाणीप्रश्न सोडविण्यास मदत होऊ शकते, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करून नागरिकांना दिलासा देण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. शेतमजुरांच्या हाताला काम द्या! दुष्काळामुळे भूमिहीन शेतमजूर, रोजंदारीवर काम करणारे मजूर आणि गरीब कुटुंबांसमोर रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शेतीची कामे ठप्प झाल्याने अनेक मजुरांना रोजगार मिळत नसून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. शासनाने रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून गावोगावी कामे सुरू करावीत आणि गोरगरीब नागरिकांच्या हाताला तातडीने काम उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. सुशिक्षित बेरोजगारांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण करा दुष्काळाचा परिणाम केवळ शेतकरी आणि शेतमजुरांपुरता मर्यादित नसून, सुशिक्षित बेरोजगार तरुणांसमोरही रोजगाराचा प्रश्न उभा आहे. स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करून बेरोजगार तरुणांना दिलासा देण्यासाठी शासनाने विशेष नियोजन करावे, अशी भूमिका आंबेडकरी जनमंचने मांडली आहे. मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा पाणीटंचाई, रोजगार आणि दुष्काळ निवारणाच्या प्रश्नांवर शासनाने लवकरात लवकर निर्णय घेऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात. अन्यथा आंबेडकरी जनमंच सामाजिक संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन छेडण्यात येईल आणि आमरण उपोषणही करण्यात येईल, असा इशारा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष विलास मस्के यांनी दिला आहे.

कुऱ्हा हरदो येथे इंदिरा गांधी यांना अभिवादन!



जन सम्राट टाईम्स

कुऱ्हा हरदो । प्रतिनिधी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे डॉ. वैशाली संसारे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या 'एक तास महापुरुषांसाठी' या उपक्रमांतर्गत ३१ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी उपपंतप्रधान, भारतरत्न आणि लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिन म्हणून, तर भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी शाळेतील शिक्षिका पुनम वाघोदे आणि छाया बहुरूपे यांच्या हस्ते दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सरदार पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या कार्याला उजाळा डॉ. वैशाली संसारे यांनी सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या जीवनकार्यावर तसेच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानावर प्रकाश टाकला. सरदार पटेल यांचे बारडोली सत्याग्रहातील नेतृत्व आणि स्वातंत्र्यानंतर विविध संस्थानांचे विलीनीकरण करून भारताला एकसंघ राष्ट्र बनविण्यात त्यांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. यावेळी राष्ट्रीय एकात्मता, देशाची अखंडता आणि सामाजिक बंधुभाव जपण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यात आले. विद्यार्थ्यांची भाषणे; प्रश्नमंजुषेत उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्यावर उत्कृष्ट भाषणे सादर केली. लावण्या सोनवणे, भाग्यश्री सुरळकर, आशिष कांडेलकर, चंदन माळी आणि पायल इंगळे यांनी भाषणांमधून आपले विचार मांडले. त्यानंतर भाषणांवर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी त्यात उत्साहाने सहभाग नोंदविला. शिक्षकांचे मार्गदर्शन व सहकार्य या उपक्रमाला शेलवड केंद्राच्या केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे, पुनम वाघोदे, योगेश बोरोले, छाया बहुरूपे, नितीन लांडे,आणि डॉ. वैशाली संसारे यांनी मोलाचे सहकार्य केले.

NCMC कार्ड सवलतीच्या नावाखाली प्रवाशांची लूट

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) राष्ट्रीय सामाईक गतिशीलता कार्ड (एनसीएमसी) स्मार्ट कार्डची सक्ती करून सामान्य प्रवाशांच्या खिशावर डल्ला मारला आहे. सवलतीच्या नावाखाली प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा घणाघाती आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेली ही योजना एसटी प्रशासनाच्या चुकीच्या अंमलबजावणीमुळे प्रवाशांसह वाहकांसाठीही डोकेदुखी ठरली आहे, असा संताप त्यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या 'एक राष्ट्र, एक कार्ड' या संकल्पनेनुसार एकाच राष्ट्रीय सामाईक गतिशीलता कार्डाद्वारे देशभरातील मेट्रो, बस, टोलनाके आणि सार्वजनिक वाहतूक सेवांचा लाभ घेता यावा, हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. मात्र, एसटी महामंडळाने या संकल्पनेलाच हरताळ फासल्याचा आरोप बरगे यांनी केला.एसटी महामंडळाने १ एप्रिल २०२६ पासून सवलतधारकांसाठी १९९ रुपये किमतीचे राष्ट्रीय सामाईक गतिशीलता कार्ड अनिवार्य केले, तर १ सप्टेंबरपासून जुने पास बंद केले. त्यामुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सवलतीचा लाभ घेण्यासाठी सक्तीने कार्ड खरेदी करावे लागत आहे.

शाळेच्या दारात पोहोचले न्यायालय; विद्यार्थ्यांना बळ!

म्युनिसिपल हायस्कूलमध्ये 'सुरक्षित बचपन अभियान' उत्साहात संपन्न

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी : बालकांचे बालपण सुरक्षित, निर्भय आणि शोषणमुक्त करण्याच्या उद्देशाने भुसावळ तालुका विधी सेवा समिती व भुसावळ वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'सुरक्षित बचपन अभियान' या जनजागृती सप्ताहाचा समारोप नगरपरिषद संचलित म्युनिसिपल हायस्कूल, भुसावळ येथे उत्साहात झाला. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच भुसावळ दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या आदेशान्वये २६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हे अभियान राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश व्ही. डी. घागी होते. यावेळी ॲड. पुरुषोत्तम पाटील, श्याम शिंदे, रूपाली नेवे यांच्यासह न्यायालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पॉक्सो, सायबर सुरक्षेसह विविध कायद्यांची माहिती या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या पॉक्सो कायदा



२०१२, सायबर सुरक्षा, बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि बालकामगार प्रतिबंधक कायद्यांची सविस्तर माहिती देण्यात आली. मोबाईल व इंटरनेटचा सुरक्षित वापर, सोशल मीडियावरील संभाव्य धोके, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क टाळणे तसेच वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बालकांवर अन्याय, अत्याचार किंवा शोषण झाल्यास घाबरून न जाता पालक, शिक्षक अथवा संबंधित यंत्रणेकडे तक्रार करून कायदेशीर मदत घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. 'बोलो, बताओ, बचाओ' या संदेशातून अन्यायाविरुद्ध निर्भयपणे आवाज उठविण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. विषयाचे महत्त्व अधिक प्रभावीपणे समजावून सांगण्यासाठी माहितीपटाचेही प्रदर्शन करण्यात आले. न्यायाधीश व मान्यवरांचा सत्कार कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक वसंत पी. सुलताने, ज्येष्ठ शिक्षक डॉ. प्रदीप साखरे आणि शिक्षिका शालिनी बनसोडे यांच्या हस्ते न्यायाधीश व उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त छावा मराठा युवा महासंघातर्फे अभिवादन!

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त छावा मराठा युवा महासंघाच्या वतीने जळगाव येथील देवा भवन परिसरातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सरदार पटेल यांच्या राष्ट्रएकात्मतेच्या कार्याचे स्मरण केले. या प्रसंगी छावा



मराठा युवा महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष अमोल कोल्हे, महिला आघाडीच्या महानगराध्यक्ष विद्या झनके, जिल्हा उपाध्यक्ष निलू इंगळे, ज्योती खरे, महानगर सचिव हितेंद्र टेकावडे, सचिव नंदू बडगुजर, चंद्रशेखर महाले, मनोहर बडगुजर, आनंद महिरे, भीमराव सोनवणे, गुरुनाथ सैंदाणे, सागर साळुंखे, योगेश चौधरी आणि सुधाकर पाटील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. दुष्काळग्रस्तांच्या परिस्थितीचे भान; अनावश्यक खर्च टाळण्याचा निर्णय यावेळी प्रदेश उपाध्यक्ष अमोल कोल्हे म्हणाले की, यंदाची दुष्काळग्रस्त परिस्थिती लक्षात घेऊन संघटनेच्या वतीने कोणतेही बॅनर लावण्यात आलेले नाहीत. तसेच शोभायात्रा, मिरवणूक किंवा रॅलीचे आयोजनही करण्यात आलेले नाही. अशा कार्यक्रमांवर होणारा खर्च समाजोपयोगी उपक्रमांसाठी वापरण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारे सरदार पटेल सरदार वल्लभभाई पटेल यांनी ५६० हून अधिक संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करून देशाच्या एकतेचा भक्कम पाया रचला. त्यांच्या या ऐतिहासिक योगदानामुळे त्यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरी केली जाते. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून सर्व जाती-धर्मांच्या नागरिकांनी एकत्रित राहावे आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, हीच सरदार पटेल यांना खरी मानवंदना ठरेल, असे मत अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले.

कुऱ्हा हरदोच्या जि. प. शाळेत विद्यार्थ्यांनी साकारले पर्यावरणपूरक आकाशकंदील!

'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा कलाविष्कार

जन सम्राट टाईम्स

कुऱ्हा हरदो। प्रतिनिधी: दिवाळी सणाचे औचित्य साधून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक आकाशकंदील आणि विविध सजावटीच्या वस्तू तयार करून आपली कलात्मकता दाखवून दिली. या उपक्रमात पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर आकाशकंदील तयार केले, तर इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी कला शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणाचा दृष्टिकोन समोर ठेवून कार्डशीट व कागदाच्या साहाय्याने विविध



आकर्षक आकाशकंदील, ग्रीटिंग कार्ड आणि सुंदर तोरणांची निर्मिती केली. कृतीतून शिक्षण; विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने, चिकाटीने आणि मेहनतीने विविध वस्तू तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळण्याबरोबरच हस्तकलेचे कौशल्य, स्वावलंबन आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळाले. दिवाळी सणाचे सांस्कृतिक महत्त्व, परंपरा आणि प्रकाशाचा संदेश याविषयीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आनंद, एकता, बंधुभाव आणि भारतीय संस्कृतीविषयी आदर निर्माण करण्याचा सुंदर प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. शिक्षकांचे मोलाचे सहकार्य या उपक्रमासाठी शेलवड केंद्राच्या केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे, पुनम वाघोदे, योगेश बोरोले, छाया बहुरूपे, नितीन लांडे, कुमुदिनी माहुरे आणि डॉ. वैशाली संसारे यांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारा आणि कृतीतून शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम शाळेत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.दिवाळी सणाचे औचित्य साधून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक आकाशकंदील आणि विविध सजावटीच्या वस्तू तयार करून आपली कलात्मकता दाखवून दिली. या उपक्रमात पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर आकाशकंदील तयार केले, तर इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी कला शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणाचा दृष्टिकोन समोर ठेवून कार्डशीट व कागदाच्या साहाय्याने विविध आकर्षक आकाशकंदील, ग्रीटिंग कार्ड आणि सुंदर तोरणांची निर्मिती केली. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने, चिकाटीने आणि मेहनतीने विविध वस्तू तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळण्याबरोबरच हस्तकलेचे कौशल्य, स्वावलंबन आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळाले.

धुळे जिल्हा न्यायालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळे जिल्हा न्यायालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई-मेल प्राप्त झाल्याने न्यायालय परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या धमकीच्या संदेशाची माहिती मिळ ताच पोलीस प्रशासन सतर्क झाले असून वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने न्यायालय परिसरात धाव घेतली. खबरदारीचा उपाय म्हणून वकील, पक्षकार आणि नागरिकांना न्यायालय परिसर खाली करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. धमकीचा ई-मेल मिळताच पोलिसांची धाव मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयाला न्यायालय बॉम्बने उडवून देण्याचा धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. या संदेशाची माहिती



पोलीस प्रशासनाला मिळताच वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. न्यायालय परिसरात तपासणी सुरू करण्यात आली असून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक खबरदारी घेतली जात आहे. न्यायालय परिसरात भीतीचे वातावरण धमकीच्या ई-मेलमुळे न्यायालयात उपस्थित असलेले वकील, पक्षकार, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी सर्वांना न्यायालय परिसर रिकामा करण्याचे आवाहन केले आहे.